# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८०–२०१०/ दिनांक :

दि. उमा चॅरिटेबल ट्रस्ट,
विजापूर रोड, घर क्र. ४०९/३,
मु.पो. जत, जि. सांगली ४१६ ४०४. — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

दि. उमा चॅरिटेबल ट्रस्ट, विजापूर रोड, जत, जि. सांगली यांनी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत वितरण कंपनी विरुध्द अनुसूचि अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रार दाखल केली आहे, त्याचा तपशील थोडक्यात खालील प्रमाणे–

अर्जदार ग्राहक हा धर्मादाय आयुक्त यांचेकडे दि. १८.१०.२००१ रोजी नोंदणीकृत झालेली संस्था आहे. तक्रारदार यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेसाठी दि. १६.६.२००७ रोजी विद्युत पुरवठा घेतला, त्या ठिकाणी नर्सिंग कॉलेज, वसतीगृह व साई मंदिर आहे. तरीही वीज जोडणी सी–७०७२ ग्राहक क्र. २७००१०७१७१७२ यांस कमर्शियल टॅरिफप्रमाणे वीज पुरवठा केला जातो, जो मा. विद्युत नियामक आयोगाचा आदेश क्र. ६५/२००६ च्या टॅरिफ मंजुरीच्या विरुध्द आहे. वि.प.ची अशी कृती व्यापारी दराने देयके देणे ही मा. आयोगाच्या MYT Order for MSECL for FY 2007-08 to 2009-10 आदेशाचे पालन न करणे होय. विद्युत पुरवठा दिलेल्या दिनांकापासून मीटर बसविले आहे, परंतु वितरण कंपनीने बसविलेल्या मिटरप्रमाणे आपल्याला कधीच देयके दिले नाहीत. बिलावर मीटर फोटो असतो तर कधी नसतो. बसविलेल्या मिटरच्या नोंदी बिलात नाहीत, उलट नसलेल्या मीटर क्रमांकाची देयके आलेली आहेत, त्यामुळे कृती मानकाचा भंग झाला आहे.

वितरण कंपनीने तक्रारदारांस ऑक्टोबर २००९ मध्ये १५५३५ युनिटसचे रु.१,०३,०५७.३२ बील दिले आहे. यापूर्वी कधीही हे बील दिलेले नाही व ही थकबाकी नोव्हेंबर २००९ अखेरची असलेने ती भरावी अन्यथा विद्युत पुरवठा खंडित केला जाईल व थकबाकी वसुलीसाठी न्यायालयीन कारवाई केली जाईल अशी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ प्रमाणे नोटीस दि. ८.१.२०१० रोजी दिली आहे. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वितरण कंपनी कलम ५६.२ चे पालन करीत नाही. तक्रारदार यांनी आपल्या तक्रारीतील पॅरा. १ मध्ये Low tension Tariff -1 LTI- Domestic यामध्ये एकून नऊ ग्राहकांची वर्गवारी केली ज्यांना घरगुती दराने वीज पुरवठा केला पाहिजे.

Students- Hostels affiliated to and / or managed by Government recognised Educational Instutitions/ Registered Charitable Instututions, except such Students Hostels affiliated to and /or managed by private Engineering / Medical Colleges or such other professional Colleges

तक्रारदार ही धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी प्राप्त संस्था असलेने व व्यापारी तत्वावर चालविली जाणारी खाजगी शिक्षण संस्था नसलेने, अशा संस्थेला घरगुती दराने वीज पुरवठा मिळणेचा हक्क मा. राज्य विद्युत नियामक आयोगाने दिलेला आहे. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी प्राप्त तक्रारदारांचे संस्थेच्या जत गावात असलेल्या मूळ शाखेस वि.प.ने घरगुती दराने दि. १८.९.२००६ रोजी वीज पुरवठा केला आहे. त्याचा क्रमांक ६९५७ ( २७००१०७१६४४३) असा असून त्याच्या बिलाची वर्गवारी घरगुती आहे. सदर संस्थेचे एम.बी.बी.एस. नंतरचे पोस्ट ग्रॅज्युटचे कॉलेज व डॉक्टरांचे वसतीगृह आहे. यास्तव तक्रारदार यांनी त्यांचे नवीन विस्तारीत व विकसीत होत असलेल्या जत गावाबाहेरील जागी विद्युत पुरवठा मागितला आहे. तक्रारदाराचे म्हणणे की, वितरण कंपनीने केलेल्या दाव्यानुसार व्यापारी दराने अर्ज केला म्हणून व्यापारी दराने वीज पुरवठा केला, हा वि.प.चा दावा कायदेशीर नाही. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम ३.४ वीज पुरवठ्याचा आकार व कलम ३.४.१ नुसार आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेल्या विजेच्या दराप्रमाणे पुरवठा केलेल्या विजेचा आकार वसूल करण्याचा अधिकार वितरण कंपनीस आहे. त्यामुळे विद्युत पुरवठा मिळाल्याच्या दिनांकापासून म्हणजे दि. १६.७.२००७ पासून घरगुती दराने विद्युत पुरवठा आहे असे समजून बील देणे जरुरी आहे. वि.प.ने बसविलेला मीटर क्रमांक ४७३९०७ असा आहे, परंतु प्रत्येक बिलात मीटर क्रमांक हा ७४०१०७४४७३ असा दाखविला आहे.

तसेच वि.प.ने डिसेंबर २००९ मध्ये दिलेले रु. १,०३,०६०/– हस्तलिखित बील अवास्तव असून त्यामध्येही चुकीचाच मीटर क्रमांक दाखविलेला आहे. वि.प.चे वाणिज्य परिपत्रक क्र. १०८ दि. १५.१.२०१० नुसार कनेक्शन तपासणी दामिनी पथकाकडून केली आहे किंवा नाही हे कळून येत नाही. तक्रारदार यांनी कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रत्यक्षात असणाऱ्या मिटरवर आधारीत बील कंपनी जेव्हा देईल, त्या कालावधीपर्यंत विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळणेस अर्जदार हक्कदार आहे. आपल्या मागणी पृष्ट्यर्थ तक्रारदार यांनी कोल्हापूर ग्राहक तक्रार निवारण मंचाचा तक्रार क्र. १००/०९ मधील दि. ३.३.२०१० च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही व्हावी अशी विनंती केली आहे. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वि.प.ने दिलेली नोटीस क्र. सहा.अभि./जत/बी/९६ दि. ८.१.२०१० ही ही प्रथमच दिलेली असून ती विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६(२) नुसारची नोटीस कायदेशीर होऊ शकत नाही. वि.प.ने मीटर रिडींग घेण्यात झालेल्या चुकीच्या कारणास्तव दि. २६.१०.२००९ रोजी भरणेसाठी येणे म्हणून रु. १,०,०६०/– दाखविली आहेत ती दि. १६.७.२००७ ते दि. १५.७.२००९ या कालावधीत कधीच दाखविली नाही. कदाचित ही मानवी चुकीमुळे असेले देणे असले तरी व ते कदाचित लागू असले तरी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६(२) प्रमाणे कालबाह्य झाले आहे. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ लातूर ग्राहक तक्रार निवारण मंचाचा दि. २९.६२००७ चा तक्रार क्र. १५०/३६/२००७ मधील आदेश व वि.प.चे परिपत्रक क्र. ५० दि. २२.८.२००६ याचा आधार घेतला आहे. मा. विद्युत लोकपाल, मुंबई यांचा केस क्र. १४४/०९ मधील दि. १५.२.२०१० चा आदेश यावार भिस्त ठेवली आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २३.१.२०१० रोजी तक्रार देवूनही कोणताही आदेश पारीत केला नाही म्हणून प्रस्तुतची तक्रार दि. १.४.२०१० रोजी मंचाकडे दाखल केली आहे. मंचाकडून तक्रारदार यांचे संस्थेस विद्युत पुरवठा मा. आयोगाच्या टॅरिफ मंजुरीप्रमाणे घरगुती दराने करावा असे आदेश वितरण कंपनीस द्यावेत, व्यापारी व घरगुती दराच्या फरकाची रक्कम रोखीने अथवा पुढील देयकात समायोजित करावी, तक्रारदारांस मिटरप्रमाणे बीले द्यावीत, कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रमाणे भरपाई मिळावी, वि.प.ने डिसेंबर २००९ मध्ये भरणेसाठी दिलेले बील विद्युत अधिनियम २००३ मधील क्लम ५६(२) नुसार कालबाह्य झाले असलेने ते संपूर्णपणे रद्दबादल झाले आहे हे जाहीर होवून मिळावे व तक्रारदाराकडून येणे बाकी निरंक आहे हे जाहीर होवून मिळावे अशी विनंती केली आहे. तक्रारदार यांनी वि.प.कडून वीज पुरवठा तोडू नये म्हणून अंडर प्रोटेस्ट भरलेल्या रकमेचा हिशोब करुन जर वि.प.कडे जादा रक्कम भरलेचे दिसून आले तर अशी रक्कम रोखीने परत मिळावी व त्या रकमेवर कलम ६२(६) विद्युत अधिनियम २००३ नुसार व्याज मिळावे अशी विनंती केली आहे. तसेच विद्युत पुरवठ्याची संहिता कलम ३.४.१ चं पालन केले नाही अशा कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई ठराविक कालावधीत व्हावी असा आदेश वि.प.स द्यावा व असे न झालेस कलम १४२ विद्युत अधिनियम २००३ नुसार अर्जदार अथवा इतर कोणीही मा. आयोगाकडे तक्रार दाखल करु शकतो असा आदेश मिळावा.

वितरण कंपनीने आपल्या दि. १४.५.२०१० चे लेखी अहवालात वि.प. विरुध्द तक्रारदाराने केलेले आदेश फेटाळले आहेत / नाकारले आहेत. तक्रारदार ही सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदविलेली संस्था आहे हे मान्य आहे, परंतु तक्रारदार यांनी या गोष्टीचा वि.प.कडे विद्युत पुरवठा मागणी करतांना उल्लेख/ खुलासा केला नाही. तक्रारदार यांनी नोंदणीकृत संस्था असल्याचे दि. २६.२.२०१० रोजी म्हणजे वीज कनेक्शन मिळाल्यानंतर जवळजवळ २ वर्ष ८ महिने इतक्या कालावधीने कागदपत्रे वि.प.कडे दाखल केली.

तक्रारदार यांनी वीज जोडणी मागणी करतांना चॅरिटेबल ट्रस्टसाठी विद्युत पुरवठा पाहिजे आहे असे सांगितले नाही. वीज मागणी अर्जात वीज जोडणी १ एचपी ही सब मर्सिबल पंपास व्यापारी (Commercial purpose) उपयोगासाठी पाहिजे असे म्हटले आहे. तक्रारदार यांनी सुरुवातीपासून आतापर्यंत सदरच्या जागेत नर्सिंग कॉलेज, साई मंदिर व वसतीगृह सुरु केल्याचे कळविले नाही. त्यासाठी प्रस्तुतच्या वीज जोडणीतून विद्युत पुरवठा घेतला आहे याची कायदेशीर परवानगी घेतली नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, तक्रारदार यांनी वीज वापराचा उद्देश बदलला आहे, तो बेकायदेशीर, अनधिकृत आहे. तक्रारदार यांस घरगुती दराने वीज बील मागण्याचा अधिकार नाही. तक्रारदाराचे कर्तव्य आहे की, त्यांनी वीज मागणी कुठल्या वापरासाठी/ उद्देशासाठी पाहिजे आहे हे स्पष्टपणे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. वितरण कंपनीने तक्रारदार यांस मागील व पुढील बीले ही मा. आयोगाचे टॅरिफप्रमाणे देण्याची तयारी दर्शविली आहे. तक्रारदार यांनी कधीपासून वीज वापर हा नर्सिंग कॉलेज, साई मंदिर व वसतीगृहासाठी सुरु केला हे स्पष्ट केल्याशिवाय अशी बीले देता येणार नाहीत, त्यामुळे तक्रार फेटाळण्यात यावी. तक्रारदार यांस वीज वापरानुसार बीले देण्यात आलेली आहेत व ती त्यांचेसाठी बसविलेल्या मीटर व रिडींगनुसारच आहेत. तक्रारदाराच्या बिलावर व सीपीएलवर मीटर क्र. ७४०१०७४४७३ हा नजरचुकीने छापण्यात आला, प्रत्यक्षात तो ४७३९०७ असा आहे, परंतु त्यामुळे तक्रारदाराचे वीज वापरात कांही फरक नाही. तक्रारदार हा बिलात चुकीची छपाई झाल्याचा फायदा घेत आहे व पैंसे भरण्याची जबाबदारी टाळत आहे. तक्रारदार संस्थेचा वीज पुरवठा खंडित न केल्यामुळे मुदतीच्या कायद्याची बाधा येत नाही. वीज बील मुदतबाह्य झाले तरी वि.प.स विद्युत पुरवठा खंडित करण्याचा अधिकार आहे. त्या पृष्ट्यर्थ वि.प.ने झारखंड हायकोर्टाच्या आदेशाचा हवाला दिला आहे. तसेच शेवटी,

If electricity bill is not issued due to human error, the date from which the same error is registered, from that date limitations of collection of electricity bill starts.

झारखंड उच्च न्यायालयाच्या आदेशाची दखल घेवून तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात यावी अशी विनंती केली आहे.

त्यापूर्वी तक्रारदार व वि.प.चे अधिकारी यांनी दि. १३.५.२०१० रोजी संयुक्त तपससणी केल्याचे दिसते. त्या तपासणी अहवालाची झेरॉक्स प्रत मंचासमोर दाखल आहे.

प्रस्तुत तक्रार दि. ९.६.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, श्री. कोळी, उच्चस्तर लिपीक उपस्थित. श्री. खापरे यांनी प्रतिपादन के ले की, तक्रारदार यांना वि.प.ने दि. १६.७.२००७ ला सिंगल फेज़ १ एच.पी.चा विस्तारीत जागेमध्ये विद्युत पुरवठा केला, परंतु कमर्शियल टॅरिफ प्रमाणे आकारणी केली ती मा. आयोगाची केस क्र. ५६/२००६ व केस क्र. ११६/२००८ च्या विरुध्द आहे. त्यामुळे दिलेले वाढीव बील कलम ५६(२) प्रमाणे कालबाह्य झाले आहे तसेच मिटरप्रमाणे बीले देण्यात आली नाहीत, प्रत्यक्षात बिलात वेगळाच मीटर क्रमांक दाखविला आहे. वितरण कंपनीने आपल्या बचावात सांगितले की, तक्रारदार यांनी ट्रस्टची कागदपत्रे दिली नाहीत हे म्हणणे बरोबर नाही. ट्रस्ट असल्यामुळे LTI- Domestic टॅरिफ लागू होतो, कारण तेथे वसतीगृह आहे. अंतर्गत कक्षासमोर व दि. १४.५.२०१० च्या म्हणण्यात वि.प.ने बीले देण्याची तयारी दर्शविली, परंतु त्याची पूर्तता होत नाही.

संयुक्त तपासणी अहवाल पाहतां कनेक्शन हेLTI- Domestic होईल. त्यामुळे मागणी केलेली रक्कम व्यापारी तत्वावर धरुन केलेली मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाविरुध्द विनियम २००५ च्या तरतुदी विरुध्द आहे. तसेच मीटर रिडींग प्रमाणे बीले देण्यात आलेली नाहीत. दिलेली बीले दुरुस्त करुन हस्तलिखित (hand written ) मधील आहेत. त्यामुळे बिलात व मीटर रिडींगमध्ये फरक आहे. विनियम २००५ मधील कलम १५ : ४ : १ प्रमाणे मीटर सदोष असेल तर तयार केलेले बील देता येईल. वि.प.ने सरासरी बील दिले आहे. वितरण कंपनीने परिपत्रक क्र. ५० ची अंमलबजावणी करुन मीटर रिडरकडून पगारातून रक्कम वसूल करावी. आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ मा. लोकपाल यांचे दि. १५.२.२०१० चा आदेश क्र. १४४/०९ चा आधार घेतला आहे. प्रतिनिधींनी झारखंड उच्च न्यायालयाचा निकाल प्रस्तुतच्या केसला लागू होत नाही असे म्हटले आहे. तक्रार मंजूर करावी व तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे वि.प.स आदेश द्यावेत. या व्यतिरिक्त तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी दि. १३.५.२०१० चे लेखी म्हणणे दि. १७.५.२०१० ला मंचासमोर दाखल केले आहे.

वितरण कंपनीचे अधिकारी श्री. भोसले, कार्यकारी अभियंता यांनी दि. १७.५.२०१० ला तक्रारदार यांनी कागदपत्रे दिल्याचे मंचासमोर सांगितले. वीज मागणी करतांना तक्रारदाराने ग्राम पंचायतीचा ८ अ चा उतारा दिला आहे, तेथे बिल्डींग नव्हती. बांधकाम हे कमर्शियल म्हणून व्यापारी दराने वीज बिलाची आकारणी करुन त्या प्रमाणे बीले दिली आहेत. श्री. भोसले यांनी टॅरिफ ऑर्डरमध्ये दि. १.६.२००८ रोजी बदल झाल्याचे मान्य केले आहे, परंतु तक्रारदार यांनी होस्टेलचे बांधकाम कधी झाले किंवा बिल्डींग कधी बांधली या बाबत माहिती दिली नाही. तसेच दिलेली बीले एस.ओ.पी. प्रमाणे आहेत. तक्रारदारास टेस्टेड इलेक्ट्रीक मीटर बसविलेले आहे, डिसप्ले आला नाही म्हणून नवीन मीटर बसविले. वापराप्रमाणे मीटर रिडींग घेवून बिलात दाखविले आहे. शेवटी, बील भरण्याचे आदेश द्यावेत, मुदतीची बाधा येत नाही, तक्रारदाराकडून येणे रक्कम कायदेशीर आहे, कलम ५६.२ लागू होत नाही, सुप्रीम कोर्टाचा केस लॉ अप्लाय करावा.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

१) तक्रारदार ग्राहक यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्याकडील कनेक्शन सी – ७०७२ याची वीज आकारणी घरगुती दराने करणे व फरकाची रक्कम व्याजासह परत देणे योग्य व कायदेशीर आहे काय ?

उत्तर : होय

२) वि.प.ने दिलेले डिसेंबर २००९ चे बील कलम ५६.२ नुसार कालबाह्य होते काय ? ते रद्द करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

३) तक्रारदार हा कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रमाणे भरपाई मिळणेस हक्कदार आहे काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार व वितरण कंपनीचे अधिकारी यांचे कथनानुसार खालील गोष्टी दोन्ही बाजूस मान्य आहेत त्या अशा –

तक्रारदार ग्राहक हे धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीप्राप्त संस्था आहे. त्याची नोंदणी दि. १८.१०.२००१ रोजी झाली आहे. वादातील कनेक्शन सी– ७०७२ पूर्वी, तक्रारदार ग्राहकास वि.प.ने नोंदणीप्राप्त संस्था घर क्र. ४५३/११/१ सिध्दार्थ नगर, जत येथे दि. १८.९.२००६ रोजी वीज पुरवठा केलेला आहे. हा वीज पुरवठा आर ६९५७ (२७००१०७१६४४३) असा क्रमांक असून बिलाची वर्गवारी घरगुती आहे. त्या ठिकाणी एम.बी.बी.एस. व पोस्ट ग्रॅज्युएटचे कॉलेज व डॉक्टरांचे वसतीगृह आहे. कदाचित हे कनेक्शन मागणी प्रमाणे दि. १६.७.२००७ रोजी मंजूर आहे. त्या ठिकाणी विद्युत पुरवठा कंपनीने दिला आहे, परंतु नर्सिंग कॉलेज, वसतीगृह व साई मंदिर हे त्याचदिवशी म्हणजे अर्ज केला तेव्हा अस्तित्वात होते काय ? याची तपासणी करावी लागेल. धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असल्याने घरगुतीLTI - Domestic कनेक्शन ग्राह्य धरुन त्यांना घरगुती दराने विद्युत पुरवठा केला पाहिजे.

वि.प.ने आपल्या लेखी अहवालात पूर्वी व आताची बीले दुरुस्त करुन देण्याची तयारी दर्शविली आहे.

तक्रारदाराचे एक एक आक्षेपाची स्वतंत्ररित्या चर्चा करणे संयुक्तिक होईल.

वादातील कनेक्शन येथे मीटर बसविले आहे, परंतु मीटर रिडींग घेतले नाही किंवा त्याच मीटर नंबरने बीले नाहीत हे तक्रारदाराचे म्हणणे ग्राह्य धरावे लागेल, कारण जरी वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ही बाब नाकारली तरी मीटर नं. ७४०१०७४४७३ हा नजरचुकीने बिलात छापण्यात आला, प्रत्यक्षात मीटर नं. ४७३९०७ नुसार वीज वापराची नोंद घेवून बीले दिली आहेत. आता तक्रारदार हा खरोखरच बिलातील चुकीच्या नंबरच्या छपाईचा गैंरफायदा घवून बील भरण्यास टाळाटाळ करीत आहे काय ? हे वि.प.चे म्हणणे विचारांत घेण्यापूर्वी कायदेशीर तरतुदी किंवा कृती मानके विनियमातील तरतुदींची पूर्तता झाली आहे काय ? हे तपासणे योग्य होईल. कारण वि.प.ने डिसेंबर २००९ चे हस्तलिखित बील दुरुस्तीनंतर दिले आहे. वि.प.चे म्हणणे डिस्प्ले दिसत नाही, नवीन मीटर बसविले याबद्दलची कागदपत्रे हजर केली नाहीत. विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी २००५ मधील कलम १५: ४ :१ वि.प.ने कुठलिही कार्यवाही केली नाही किंवा नादुरुस्त मीटर आहे असेही म्हटले नाही, त्यामुळे मीटर टेस्ट करण्याचा प्रश्न येत नाही. वि.प.च्या दि. २५.१.२०१० च्या पत्रानुसार सुरुवातीला मीटर क्र. १०५६०१०७४४७३ बसविण्यात आले होते परंतु त्या मिटरवर डिस्प्ले येत नसल्याने सदरचा मीटर दि. २२.९.२००७ ला बदलून मीटर क्र. ४७३९०७ बसविले. नोव्हेंबर २००९ मध्ये सदर मिटरचे रिडींग १७९०३ नोंदविले होते. सरासरी बिलाची आकारणी करुन त्या २८ महिन्याच्या काळाचे बील देण्यात आले. यामध्ये तक्रारदाराने भरलेली रक्कम वजा करुन बीले देण्यात आली आहेत. त्यावर विलंब अकार अथवा व्याज आकारणी करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत वि.प.चे परिपत्रक क्र. ५० या केसमध्ये अंमलात आले किंवा लागू करण्याचा प्रश्नच येत नाही. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, तक्रारदार ग्राहक यांचे मूळ कनेक्शन घरगुती ६९५७ दि. १८.९.२००६ रोजी मंजूर करण्यात आले आहे, त्यासाठी तक्रारदार संस्था ही धर्मादाय नोंदणीकृत संस्था आहे हे वि.प.ने मान्य केले असून त्यांस वि.प.ने वर्गवारी घरगुती केली आहे. परंतु नवीन विस्तारीत व विकसित होत असलेल्या जत गावाबाहेरील जागेत वीज पुरवठा मागितला असतां, शेत जमीन असल्याने १ एचपी कनेक्शन सबमर्सिबल पंपासाठी मागितल्याने वर्गवारी व्यापारी केल्याचे दिसते. अशा परिस्थितीत वि.प.ने तक्रारीमध्ये सदरची वीज जोडणी मागणी केलेली संस्था धर्मादाय आयुक्ताकडे नोंद झालेली आहे याची कागदपत्रें दिली नाहीत हे लंगडे समर्थन आहे असे म्हणावे लागेल.

या उलट, मा. आयोगाचे टॅरिफ ऑर्डरप्रमाणे वेळोवेळी मंजूर केलेप्रमाणे धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत संस्था व त्या ठिकाणी चालविले जाणारे नर्सिंग कॉलेज, वसतीगृह व साई मंदिर कधी उभे राहिले किंवा त्याचे बांधकाम पूर्ण झाले याची माहिती नसल्याने व्यापारी दराने वीज आकारणी केली हे म्हणणे म्हणजे विचारांती बचाव घेतला आहे असे दिसते, कारण दि. १३.५.२०१० चा संयुक्त पहाणी अहवालाची झेरॉक्स प्रत मंचासमोर दाखल आहे, त्यात पॅरा. ४अ मध्ये वीज वापर होत असलेल्या ठिकाणांचे वर्णन आहे व पॅरा. ४ब मध्ये मुख्य इमारतीचे पश्चिमेस इंग्लीश मेडीयम स्कूल असून त्याचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले असून त्या ठिकाणी लाईट फिटींगचे काम चालू आहे. पॅरा. ४ड मध्ये मुख्य इमारतीवरती दुमजल्याचे बांधकाम सुरु आहे. मुख्य इमारतीच्या दर्शनीयभागी श्री. साई मंदिर असून त्यसाठीही वीज पुरवठा चालू आहे. त्यामुळे तक्रारदाराचे म्हणणे की, वीज वापर हा धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेच्या मुलींचे हॉस्टेल, नर्सिंग कॉलेज, श्री. साई मंदिर साठी होत आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे वितरण कंपनीने व्यापारी तत्वाने (कमर्शियल टॅरिफ) प्रमाणे केलेली वीज बिलाची आकारणी निश्चितच चूक आहे व होते व मा. आयोग केस क्र. ६५/२००६ नुसार LTI Domestic याचे विरुध्द आहे. थोडक्यात म्हणजे तक्रारदार म्हणतो त्याप्रमाणे वितरण कंपनीने मा. आयोगाच्या आदेशाचो पालन केलेले नाही. विशेष म्हणजे वर उल्लेख केल्याप्रमाणे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. १४.५.२०१० च्या अहवालात –

MSEDCL is ready to issue bills in future / in past following the MERC Regulations / applicable tariff

त्यामुळे प्रस्तुतच्या कनेक्शनची वर्गवारी बदलून घरगुती दराने वीज आकारणी करण्याचे आदेश देणे कायद्याला धरुन संयुक्तिक व योग्य होईल. तक्रारदाराने आपल्या तक्रारीत म्हटल्याप्रमाणे, त्याच ट्रस्टला यापूर्वी त्याच गावात दि. १८.९.२००६ रोजी विद्युत पुरवठा केला आहे. घरगुती वापराप्रमाणे वीज आकारणी केली आहे. त्याचा नं. आर– ६९५७ आहे. त्यामुळे वि.प.चे म्हणणे तक्रारदाराने व्यापारी दराने विद्युत पुरवठा मिळावा म्हणून अर्ज दिला हे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ व मा. विद्युत नियामक आयोग यांच्या आदेशास अनुसरुन नाही. दुसरे म्हणणे की, तक्रारदाराने दि. २६.२.२०१० रोजी कागदपत्रें दिल्यानंतर सदर शैंक्षणिक संस्थेची धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असल्याचे समजले त्यामुळे पूर्वीची कॅटेगिरी चालू राहिली हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. अशा परिस्थितीत वि.प.ला तक्रारदाराची बील वापराची वर्गवारी बदलून घरगुती टॅरिफप्रमाणे बील देणेचा आदेश देणे जरुरी आहे.

अशा रितीने वर्गवारी बदललेनंतर वीज वापराची व भरलेली रक्कम यातील फरक तक्रारदाराचे पुढील ३ बिलींग सायकलमध्ये समायोजन करणेचा आदेश देणे क्रमप्राप्त आहे. विद्युत अधिनियम २००३ मधील कलम ६२ उप कलम ६मधील तरतुदीनुसार जादा भरलेली रक्कम तक्रारदार किंवा ग्राहकास परत मिळणेचा हक्क आहे ती व्याजासह –

Along with interest equivalent to the bank rate without prejudice to the any liability incurred by the Licensee

त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय आहे असे नोंदविण्यात येत आहे.

तक्रारदाराचे म्हणणे की, केस क्र. ५४/२००७ मधील दि.१९.१०.२००७ चा मा.लोकपाल, मुंबई यांनी वि. प. विरुध्द दिलेला आदेश त्यांना अंशत: मान्य आहे. येथे असे स्पष्ट करावेसे वाटते की, आदेश किंवा जजमेंट हे पूर्णपणे एकत्रितरित्या वाचावे लागतात व त्याच्या परिणामाचा विचार करावा लागतो. अंशत: मान्य आहे हे निर्णय अमान्य केल्यासारखे होते. असे असले तरी, पॅरा ४ मध्ये मा. लोकपाल यांनी निरीक्षण केले आहे की,

Applicability of tariff is based on the purpose for which electricity is being used.

प्रस्तुतच्या तक्रारीमधील दि. १३.५.२०१० चा संयुक्त तपासणी अहवाल व तक्रारदार शैंक्षणिक नोंदणीकृत संस्था असल्याने वीज वापर हा शैंक्षणिक संस्था व होस्टेल यासाठी होत आहे हे सिध्द होत आहे. त्यामुळे मा. आयोगाची टॅरिफ ऑर्डरLTI Domestic Connection नुसार प्रस्तुतची तक्रारीमध्ये घरगुती दराने आकारणी करणेत यावी. वि.प.ने सदरच्या वीज जोडणीची आकारणी व्यापारी तत्वानुसार केली ती निश्चितपणे चूक आहे. पॅरा ११ मध्ये परतावा हा बँकेच्या व्याजदरासह देणेचा आहे असे कलम ६२(६) विद्युत अधिनियम २००३ मध्ये दिले आहे. तक्रारदार यांनी तक्रारीत म्हटल्याप्रमाणे नाशिक ग्राहक मंचाचा तक्रार क्र. १४/०८ मधील आदेश आपल्या कागदपत्रासोबत जोडल नाही, अर्थात तो परिपत्रक क्र. ५० दि. २२.८२००६ बाबतीत असून चुकीचे मीटर रिडींग घेतल्याबद्दल करावयाच्या कारवाईबाबतचे आदेश आहेत. तक्रारदाराच्या तक्रारीमधील पॅरा ३ मधील लातूर ग्राहक तक्रार निवारण मंचाची तक्रार क्रमांक १५०/३६/२००७ आदेश दि. २९.६.२००७ चा संदर्भ दिला आहे. आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ ग्राहकाची तक्रार रिडींग न घेता अंदाजे रिडींग टाकून अवास्तव दिलेली बीले दुरुस्त करुन देणे बाबत आहे. तक्रारदाराने ४ वर्षापूर्वी वीज कनेक्शन घेतले आहे, लाईट बंद आहे, नवीन जागेत कनेक्शन घ्यावयाचे आहे. मंचाने सी.पी.एल. वरील तरतुदी व चालू मीटर रिडींग पाहिल्यावर असे निरीक्षण केले की, प्रत्यक्ष रिडींग घेतल्याचे दिसत नाही. ऑगस्ट २००४ ते एप्रिल २००५ या कालावधीत सीपीएलवर रिडींग तेच म्हणजे ३२३१ आहे. त्यामुळे सदरील बील रद्द करण्यात यावे, थकबाकी निरंक समजावी असे आदेश दिले आहेत. खेदाने येथे नमूद करावेसे वाटते की, प्रस्तुतचा निकाल हा तक्रारदाराचे कथनास लागू होणारा नाही किंवा पुष्टी देणारा नाही. तक्रारदाराने वेगवेगळ्या मिटरचा वाद उपस्थित केला आहे. रिडींग प्रमाणे बीले द्यावीत व भरपाईचे आदेश द्यावेत अशी तक्रारदाराने मागणी केली आहे, तक्रारदाराने पॅरा ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वि.प.ने दि. ८.१.२०१० चे नोटीसीनुसार थकबाकी भरा अन्यथा वीज पुरवठा खंडित केला जाईल. त्यांस हरकत घेत अशी नोटीस ५६(१) प्रमाणे कायदेशीर होवू शकत नाही व कलम ५६(२) नुसार कालबाह्य येणे कंपनी थकबकी म्हणून मागील कालावधीत सातत्याने दाखवित नसलेने, ही थकबाकीतर नाहीच शिवाय हे कंपनीकडे कोणतेही देणे बाकी नाही.

मंचासमोर या संदर्भात तक्रारदाराने आपल्या म्हणण्यापृष्ट्यर्थ मा. लोकपाल यांचे पिटीशन नं. १४४/०९ मधील दि. १५.२.२०१० च्या आदेशावर भर दिला आहे.हे खरे की, डिसेंबर २००९ चे बिलात दाखविलेली बाकी या पूर्वीच्या बिलात कधीही थकबाकी म्हणून वि.प.ने दाखविलेली नाही. परंतु वि.प.ला ५६(१) प्रमाणे कारवाई करता येईल काय ? किंवा ५६(२) तक्रारदाराने सांगितल्याप्रमाणे मागणी कालबाह्य आहे हा वादाचा मुद्दा आहे. येथे असे नमूद करावेसे वाटते की, मुद्दा क्र. १ चे उत्तर होय आहे. वि.प.ने वीज जोडणीची वर्गवारी बदलून फरकाची रक्कम व्याजासह देण्याची मागणी मान्य केल्यानंतर या वादाबद्दल फारसा ऊहापोह करण्याची गरज नाही किंवा या मुद्दयावरील मागणी कालबाह्य होते.

कलम ५६(२) नुसार अथवा ५६(१) नुसार अशी कारवाई करता येईल काय ? हे गौंण ठरते. तरीही मंचापुढे सुनावणीवेळी तक्रारीत सांगितल्याप्रमाणे, मा. लोकपालांच्या आदेशाचे वाचन केले असतां, तक्रारदार यांनी २००७ साली मागणी केलेल्या वीज बिलाबाबतचा वाद उत्पन्न केला आहे, परंतु तो बिलाचा कालावधी सप्टेंबर १९९९ ते सप्टेंबर २००१ असा आहे. मंचाने रिसपॉन्डंट बेस्ट अंडरटेकींग यांना सप्टेंबर १९९९ ते २१ जानेवारी २००० व २१.१.२००० ते ६.९.२००१ या काळातील बीले वसुलीची परवानगी दिली. ती बीले सप्टेंबर २००३ मध्ये देण्यात आली होती. मा. लोकपाल यांनी पॅरा १४ अंतर्गत पृष्ठ क्र. ६ आदेशामध्ये कलम ५६(२) विद्युत कायदा २००३ बाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचा श्री. अवादेशपांडे आणि टाटा पॉवर कंपनी लि. या प्रकरणातील आदेश विचारांत घेतले आहेत. यामध्ये –

In our opinion, sub secton (2) only provides a limitation, that the recourse to recovery by cutting of electricity supply is limited for a period of two years from the date when such sum became due. As long as sum is due, which is wthin two years of the demand and can be recovered, the licensee of the generating company can exercise this power of coercive process of recovery by cutting of electricity supply. This is a special mechanism provided to enable the licensee or the generating company to recover its dues expeditiously.

.. ..

त्या केसमधील मा. लोकपाल यांचे आदेश कायम केले आहेत.

After considering the various provisions including the regulations, the Ombursman held, only those charges for a period of two years previous to the demand could be recovered and that the arrears for the consumption in Janunary, 2004 became first due in February, 2004 as supplementary bill was raised in 2006 and these dues been within two years are recoverable under the provisions of Section 56 (2) of the Electricity Act.

पॅरा १९ मध्ये मा. लोकपाल यांनी असे निरीक्षण केले की,

It would be incorrect to allow the Respondent to recover the old arrears beyond two years.

तसेच पुढे त्या पॅरामध्ये असे म्हटले आहे की –

It can not be the intention of law to empower Distribution Licensee to raise and try to recover old dug out bills under the guise of Section 56(2). In fact, provision to put a time limit and restrict the period for making recovery was provided to protect the consumer from such belated and arbitrary action of the distribution licensee arising out of their own lapses. Such provision was not there under Section 24 of the erstwhile Indian Electricity Act 1910 ( the corresponding provision in the old Act) for protection of consumers.

In view of the aforesaid, there is no difficulty in concluding that the Respondent's claim to recover arrears pertaining to the period of Sept.1999 to 6th Sept. 2001, by raising a bill in Sept. 2003 is clearly time barred as per Section 56(2) of Electricity Act 2003. The said claim deserves to be and is hereby set aside as barred by limitation. In the result, the representation succeds and is hereby allowed. The Respondent is directed to rework bill, accordingly, Excess amounts recovered, if any, shall be refunded with interest at bank rate, as stipulated in Section 62(6) of the Act.

प्रस्तुतच्या केसमध्ये दि. १६.७.२००७ ला वीज जोडणी झाली आहे. ऑक्टोबर २००९ मध्ये १५५३५ युनिटसचे रु.१,०३,०५७.३२ बील दिले आहे. वि.प.च्या दि. ८.१.२०१० च्या मागणीमध्ये ५६.१ प्रमाणे कारवाईच्या अधिकाराचा उल्लेख केला आहे. मा. लोकपाल यांचा केस क्र. १४४/०९ मधील दि. १५.२.२०१० चा आदेश प्रस्तुतच्या केसला लागू केल्यास, ऑक्टोबर २००७ पूर्वीची रक्कम कालबाह्य होईल हे स्पष्ट होते.

वि.प.तर्फे पिटीशन मे. स्वस्तिक इंडस्ट्रीज विरुध्द महाराष्ट्र राज्य विद्युत बोर्ड या मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या स्पेशल लिव्ह पिटीशन मधील न्याय निर्णयावर भर दिला आहे, ते पिटीशन दि.२४.१.१९९७ रोजी फेटाळले. अर्जदाराने नॅशनल कंझ्यमर्स डिसप्यूट रिड्रेसल कमिशनर, न्यू दिल्ली अपील नं. ५२०/९५ दि. ३०.८.१९६६ चे आदेशाविरुध्द सर्वोच्च न्यायालयासमोर चॅलेंज केले होते. प्रस्तुत निर्णयाचे वाचन केले असतां, त्या केसमध्ये भारतीय विद्युत अधिनियम १९१० व त्यामधील कलम २४ चा ऊहापोह केला आहे. त्यामध्ये –

The Indian Electricity Act 1910 gives power to the Board to issue such demand and to discontinue the supply to a consumer who neglects to pay the charges.

व त्यापुढे कलम ६० अ विद्युत पुरवठा कायदा १९४८ नुसार ३ वर्षांची मुदत ज्यायोगे मंडह सदर रक्कम वसुलीसाठी दावा दाखल करु शकते. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी जुन्या कायद्याखाली केस का दाखल केली हे गौंडबंगाल आहे, कारण विद्युत अधिनियम २००३ दि. १०.२.२००३ पासून अंमलात आले असून प्रस्तुतचे कनेक्शन हे दि. १६.७.२००७ चे आहे. त्यामुळे नवीन कायद्यातील व विनियम २००५ चीच अंमलबजावणी करावी लागेल. तसेच मे. टाटा स्टिल लि. आणि इतर विरुध्द झारखंड राज्य विद्युत मंडळ मधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश एआयआर २००८ झारखंड ६० मंचासमोर हजर केले आहे. प्रथमत: केस लॉ पूर्णपणे दिलेला नाही त्याचे कारण देणाऱ्यालाच माहित. फक्त पान क्र. ६१ पासून ६४ पर्यंत आहेत आणि प्रस्तुतचे केसशी दुरान्वयेही संबंध नाही म्हणून त्यातील निरीक्षण अथवा आदेश या केसला लागू होत नाहीत असे स्पष्ट करावेसे वाटते.

वि.प.ने दिलेले बील कलम ५६(२) प्रमाणे पूर्णत: कालबाह्य होत नाही ते पूर्ण रद्द करणे योग्य होणार नाही. मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारात्मक नोंदविणेत येत आहे. तक्रारदार यांनी आपल्या पॅरा २ मध्ये कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रमाणे प्रत्यक्षात असणाऱ्या मिटरवर आधारीत बील कंपनी जेव्हा देईल त्या कालावधी पर्यंत विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळणेस हक्कदार आहे. त्यासाठी या मंचाच्या तक्रार क्र. १००/२००९ मधील आदेशाचा आधार घेतला आहे. वि.प.ने यांस हरकत घेतली आहे. लेखी अहवालात पॅरा ४ मध्ये –

In fact the bills are issued according to use through the installed meter itself and they are according to use and are correct. By over site the meter No. 7401074473 is printed on bill/ CPL which should be in fact 473907. By this mistake there is no change in the electricity consumption of the complainant.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (परवानेधारकाच्या कृतीची मानके, पुरवठ्याचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ चे कलम १२.१ प्रमाणे जर कृती मानकाची पूर्तता करण्यात अपयश आल्यास स्वत: किंवा तक्रारदाराचे लेखी मागणीनुसार वितरण कंपनीवर तक्रारदार यांस नुकसान भरपाई देणे परिशिष्ट अ मध्ये दाखविल्याप्रमाणे बंधनकारक आहे. परिशिष्ट अ ७.१ प्रमाणे –

Reading of consumer's meter

Once in every two months Rs. 100/- for first month or part thereof of delay and Rs. 200/- per month or part thereof beyond the first month of delay.

केवळ बिलामध्ये मीटर क्रमांकाची चूक आहे, मीटर रिडींग घेतलेले आहे व तक्रारदार यांनी केलेल्या वीज वापराची नोंद मिटरमध्ये आहे, त्यानुसार वीज बीले देण्यात आली आहेत ती भरली आहेत. अशा परिस्थितीत, वि.प.ला कृती मानकाची पूर्तता करण्यात अपयश आले आहे असे म्हणता येईल काय ? हा प्रश्न आहे. याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल, वरील कारणानुसार उत्तर नकारार्थी द्यावे लागेल, त्यामुळे परिशिष्ट अ ७.१ प्रमाणे भरपाई देण्याचा प्रश्न येत नाही. तक्रारदार यांनी या मंचाचा आदेश क्र. १००/०९ चा हवाला दिला आहे. त्या केसमधील ग्राहक हा शेती ग्राहक होता. पुरवठ्याची संहिता अटीनुसार १४.३ प्रमाणे शेती ग्राहकाचा मीटर वापराची नोंद दर ३ महिन्यातून एकदा घेतली पाहिजे, ती तरतूद बंधनकारक आहे. कृती मानकाचा भंग झाल्यास ग्राहकास भरपाई मिळण्याचा हक्क आहे. या ग्राहक मंचाच्या केस क्र. १०/०९ मध्ये दि. ५.५.२००६ ते डिसेंबर २००७ या कालावधीचे मीटर रिडींग प्रमाणे बिलींग झाल्याचे सीपीएल प्रमाणे दिसते. परंतु ग्राहकाने विकत आणलेला मीटर का बदलला या बद्दल वि.प.ने खुलासा केलेला नाही. जानेवारी २००८ ते जून २००९ या काळातील कृती मानकातील तरतुदीनुसार वीज बीले देण्यात आली नाहीत म्हणून नुकसान भरपाई देण्यात आली. थोडक्यात, केस क्र. १००/०९ मधील वस्तुस्थिती व प्रस्तुतच्या केस मधील वस्तुस्थिती वेगवेगळी आहे. प्रस्तुतच्या केसमध्ये वर्गीकरण चुकीचे झाले असून घरगुती दराने आकारणी होणे हा मुख्य मुद्दा आहे, त्यांस वि.प.ने तयारी दर्शविली आहे. कदाचित सुरुवातीला अर्ज देतांना पूर्ण कागदपत्रें न दिल्याने व्यापारी दरसंकेतानुसार वर्गवारी करण्यात आली असावी, ती दुरुस्त करुन देण्याचे आदेश मंच वि.प.स देत आहे. त्यामुळे भरलेली बीले व येणारी बीले यानुसार होणारी फरकाची रक्कम व्याजासह परत देण्याचे आदेश मंच देत आहे. त्यामुळे कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रमाणे प्रत्यक्षात असणाऱ्या मिटरवर आधारीत बील मिळावे ही मागणी फेटाळण्यात येत आहे. मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

प्रस्तुत तक्रार १ एप्रिल २०१० मध्ये मंचासमोर दाखल करण्यात आली. त्याची सुनावणी दि. ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. मंचाचा बराच वेळ केस क्र. ५९–६०/२०१० व केस क्र. ६१/२०१० व सोलापूर विभागातील केस क्र. २२४/०९ व केस क्र. २०१/०९ मध्ये गेल्याने तक्रार दोन महिने मुदतीत निकाली काढणेत आली नाही.

## आदेश

१) तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहक यांचे सी–७०७२ (२७००१०७१७१७२) या कनेक्शनची मा. विद्युत नियामक आयोगाचे टॅरिफ मंजुरीनुसार घरगुती दराने आकारणी करावी व फरकाची रक्कम तक्रारदार यांनी पॅरा. १ मध्ये मागणी केल्याप्रमाणे पुढील देयकातून समायोजित करावी.

३) तक्रारदाराची कृती मानके विनियमातील कलम १२ प्रमाणे व परिशिष्ट अ मधील ७.१ प्रमाणे भरपाईची मागणी फेटाळणेत येत आहे.

४) तक्रारदार यांनी मंचाचे आदेशानुसार वितरण कंपनीकडे भरलेली रक्कम वरील आदेशानुसार होणाऱ्या बिलामध्ये समायोजित करावी व जादा असल्यास ती तक्रारदार यांस रोखीने १२% व्याजासह परत करावी.

५) तक्रारदाराची मागणी संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंग कारवाई करावी असा आदेश वि.प.स द्यावा ही मागणी फेटाळणेत येत आहे.

६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )

अध्यक्ष